# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**6 JULY, 2018**

[Time : 11-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना** : गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा :

---

**[गुण : ४०]**

चार दिवसांसाठी कुठे प्रवासाला जायचे म्हटले की, माणूस कुठे उतरायचे कुठे जेवायचे, चार दिवस कपडे कोणते घालायचे, अंथरायचे, पांघरायचे या सर्व गोष्टींचा विचार करतो व त्यानुसार नियोजन करतो. समर्थ व्यवस्थापन, नियोजन यामध्ये किती तत्पर होते ते आपण पाहिले. अशा माणसाने एका क्षणात घरदार सोडताना पुढच्या योजनेचा काहीच का विचार करु नये. याचा सरळ सरळ अर्थ असा की, त्यांनी घर सोडावे आणि तपश्चर्येसाठी नाशिकला यावे असा स्पष्ट आदेश त्यांना रामरायाकडून प्राप्त झाला असावा. जो माणूस भगवंतावर एवढा भरवसा ठेवतो त्याची भगवंत निश्चित काळजी घेतो. निदान अन्न, वस्त्र आणि निवारा याची सोय भगवंत निश्चित करेल. निदान समर्थांच्या काळात साधू पुरुषाला दोन वेळचे जेवण सुखाने मिळत होते.

नाशिकमध्ये त्या काळी अनेक बटू वैदिक शिक्षण घेत असत. पूर्वी आत्तासारख्या सार्वजनिक संस्था नसायच्या. अन्नछत्र मात्र जागोजागी चालायचे. बटूंना माधुकरी उत्तम मिळत होती. भिक्षेचा अवलंब अनेक लोक करत असत. भिक्षा मागणे हे कमीपणाचे समजले जात नव्हते. समर्थांना नाशिकमध्ये भिक्षा उत्तम मिळत होती. अनेक माता आणि भगिनी बटूला भिक्षा वाढल्या खेरीज भोजन करत नसत. उलट भिक्षेत मिळणारे पक्वान्नाचे पदार्थ किंवा तळलेले पदार्थ पाहिल्यावर समर्थांच्या मनात आले की, रोज असे जड पदार्थ खाल्ले तर आपला देह निद्रेच्या अधीन होईल. दासबोधात श्रवणातील विक्षेप समर्थांनी सांगीतले आहे.